स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

# जनसंपर्क विभाग

**जळगाव दि. २७ (प्रतिनीधी) :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्त काढण्यात आलेल्या भित्तीपत्रकाचे विमोचन शुक्रवारी करण्यात आले.

विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, उपवित्त लेखाधिकारी सोमनाथ गोहिल यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा.म.सु. पगारे हे होते. यावेळी बोलतांना रवींद्र पाटील यांनी सामाजिक माध्यमांचा वापर कमी करून विद्यार्थ्यांनी वाचनावर अधिक भर द्यावा त्यामुळे विचारांच्या कक्षा व्यापक होतील असे मत मांडले. श्री. गोहिल यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्रा. म.सु. पगारे यांनी संपादनाच्या शिस्तीचे महत्व सांगितले. भित्तीपत्रकातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो असे ते म्हणाले. सदर भित्ती पत्रकाचे मयुर सोनवणे, सुशिला पावरा, मयुरी लोंढे, आकाश कोंगळे, निशा सपकाळ, विशाल वळवी, गायत्री साळुंखे या विद्यार्थ्यांनी संपादन केले. उज्वला लांडगे यांनी सुत्रसंचालन केले तर प्रा.बाळासाहेब सुर्यवंशी यांनी आभार मानले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २७ जानेवारी, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी